# Conviction in Rape Case

# परिस्थितीजन्य पुराव्यावरुन ठोठावली शिक्षा

## जिल्हा व सत्र न्यायालयाचा ऐतिहासिक निकाल; पिडित मुलीसह १२ साक्षीदार फितूर





**धुळे :** तिखी येथील सामूहिक बलात्काराच्या घटनेतील मोबाईल चित्रीकरण, डीएनए चाचणी आणि तपास अधिकारी प्रभारी पोलीस अधीक्षक चंद्रकांत गवळी यांच्या महत्वपूर्ण साक्षी, परिस्थितीजन्य पुरावे, विशेष सरकारी वकील निर्मलकुमार सूर्यवंशी व जिल्हा सरकारी वकील शामकांत रावजी पाटील यांचा ठोस युक्तीवाद न्यायालयाने ग्राह्य धरुन ७ नराधमांना २० वर्षे सक्तमजुरीची शिक्षा ठोठावली. हा निकाल ऐतिहासिक ठरला आहे. या निकालानंतर न्यायालयाच्या आवारात मोठ्या प्रमाणात गर्दी झाली होती. निकालानंतर नराधमांसह त्यांच्या आत्पस्वकीयांना रडू कोसळले.

मोहाडी गावातील १६ वर्षीय अल्पवयीन मुलीला गावातीलच विधीसंघर्षीत तरुणाने एका कार्यक्रमानिमित्त नातेवाईकांकडे घेवून जात असल्याचे सांगुन दि. २४ सप्टेंबर २०१३ रोजी मोटरसायकलीने (एमएच १८/ एएच ४९१७) तिखी शिवारातील डेडरगाव तलाव परिसरात नेले होते. या ठिकाणी त्याचे मित्र राहुल भास्कर गावडे (१८), महेश शिवदास गावडे (२०), राजू दगडू गावडे रा. मोहाडी हे तिघेही आले होते. या चौघा नराधमांनी दुपारी १२.३० ते ३.३० च्या दरम्यान पिडित मुलीवर आळीपाळीने बलात्कार केला त्याचवेळी त्यांच्यातील

चित्रीकरण केले. हा सर्व प्रकार सुरु असतांना एका वाळूच्या ट्रॅक्टरवर आलेले मजूर संतोष रोहिदास बोरसे (२६), एकनाथ रामदास पवार (२८), चंदर एकनाथ मोरे (२२), धर्मा भगवान अहिरे (२३) रा. इंदिरानगर भिलाटी रानमळा ता. धुळे या चौघा नराधमांनीही पिडित मुलीवर पुन्हा आळीपाळीने बलात्कार केला. हा प्रकार कोणाला सांगितला तर मोबाईलमधील चित्रीकरण प्रसिध्द करण्याचे सांगून पिडित मुलीला जीवेठार मारण्याची धमकी दिली होती.

**चंद्रकांत गवळींनी हाताळला तपास**

या घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन तत्कालीन पोलीस अधीक्षक प्रदीप देशपांडे यांनी तपासाची सूत्रे तत्कालीन पोलीस उपअधीक्षक तथा सध्याचे प्रभारी पोलीस अधीक्षक चंद्रकांत गवळी यांच्याकडे सोपविली होती. त्याअनुषंगाने गवळी यांनी तपासातील बारकावे शोधून ठोस पुरावे गोळा

तयार केलेली चित्रफीत डिलीट केल्यानंतरही विशेष तंत्रज्ञाची मदत घेऊन पोलिसांनी ही चित्रफीत पुन्हा मिळवली. पुराव्याच्या दृष्टीने त्याची एक सीडी तयार केली. तसेच घटनेच्या वेळी आरोपींच्या अंगावरील कपड्यांवर पीडित मुलीच्या रक्ताचे डाग उमटले होते. ते रक्त व मुलीचे रक्त डिएनए चाचणीसाठी पाठविले होते. हे नमूने आरोपींचेच असल्याचे डीएनए चाचणीवरुन निष्पन्न झाले होते. यासह २१ साक्षीदार, पंच, पुरावे तयार करुन गवळी यांनी न्यायालयात दोषारोपपत्र सादर केले होते. यासाठी गवळी यांना मोहाडी पोलीस ठाण्याचे तत्कालीन सहाय्यक पोलीस निरीक्षक हेमंत पाटील, जमादार सु.का. पाटोळे, पोना नरेंद्र कुळकर्णी, पोकॉ प्रभाकर बैसाणे, बापू कोकणी, किशोर खैरनार, संदीप खैरनार, प्रशांत चौधरी, मुकुंद पाटील, भदाणे, महिला पोलीस शिला सूर्यवंशी यांनी मदत केली.

**विशेष खटला**

**हेच ते नराधम**



होणारे परिणाम व जनतेचा रोष, सामाजिक संस्था, महिला अत्याचार निवारण संस्था यांनी काढलेले मोर्चे, निवेदने यामुळे हा खटला विशेष न्यायालयात चालविण्याचा आदेश झाला.

यांच्या विशेष न्यायालयात हा खटला चालविण्यात आला.

**न्यायालयाने तपासले साक्षी, पुरावे**

या खटल्यात एकूण २१ साक्षीदार तपासण्यात आले. जिल्हा सरकारी वकील शामकांत रावजी पाटील यांनी ११ साक्षीदार तपासले तर विशेष सरकारी वकील निर्मलकुमार सूर्यवंशी यांनी १० साक्षीदार तपासले. यासह तपास अधिकारी चंद्रकांत गवळी यांची प्रमुख साक्ष नोंदविण्यात आली. चित्रफितीची सीडी तयार करणारे भावेश निकम यांची व डिएनए चाचणीचा अहवाल देणारे श्रीकांत लाडे या तिघांच्या महत्वपूर्ण साक्षी न्यायालयाने नोंदवून त्या ग्राह्य धरल्या. तसेच इतर ९ महत्वपूर्ण साक्षीदारांचीही साक्ष ग्राह्य धरण्यात आली.

**पीडित मुलीसह १२ साक्षीदार फितूर**

जिल्हा व सत्र न्या. आर.आर.कदम यांनी तपासलेल्या २१ साक्षीदारांपैकी १२ साक्षीदार फितूर झाले. प्रत्यक्षात या गुन्ह्यातील फिर्यादी पिडित मुलगी देखील फितूर झाली होती. परंतु न्यायालयाने अखेर परिस्थितीजन्य पुरावे, साक्षी आणि प्रत्यक्ष घटना याचा योग्य न्यायनिवाडा करुन या खटल्याचा निर्णय दिला. ७ नराधमांना शिक्षा ठोठावली तर विधीसंघर्षीत मुलाबाबत बाल न्यायालयात खटला सुरु आहे. अशी माहिती जिल्हा सरकारी वकील शामकांत रावजी पाटील यांनी प्रसारमाध्यमांशी बोलतांना दिली.

**दंडाची रक्कम पिडित मुलीला**

न्यायालयाने या खटल्यात वरील ७ नराधमांना २० वर्षे सक्त मजुरी व २ हजार रुपये दंड, दंड न भरल्यास तीन महिने शिक्षा, पास्को कायद्यान्वये ७ वर्षे सक्तमजुरी, ५०० रुपये दंड अशी शिक्षा ठोठावली आहे. यातील दोघा कलमातील दंडाची रक्कम एकूण १७ हजार ५०० रुपये पिडित मुलीला देण्याचे आदेश न्या. कदम यांनी दिले आहेत.

**न्यायालयात पोलीस बंदोबस्त**

हा निकाल लागल्यानंतर न्यायालयाच्या आवारात गर्दी झाली होती. शिक्षा झालेल्या ७ नराधमांच्या नातेवाईकांनी न्यायालयाच्या आवारातच डाहो फोडला. न्यायालयाचा निर्णय पचनी न पडलेल्या अनेक आत्पस्वकियांनी रोष व्यक्त करण्याचा प्रयत्न केला. परंतु वेळीच पोलीस यंत्रणा दाखल झाल्याने काही अनर्थ घडला नाही. न्यायालयात प्रभारी पोलीस अधीक्षक चंद्रकांत गवळी, पोलीस उपअधीक्षक हिंमत जाधव, शहर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक अनिल वडनेरे, महिला-पुरुष कमांडो असा मोठा फौजफाटा दाखल झाला होता.